# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १६१/२०२२

तक्रारकर्ता, श्रीम.हर्षला गोपाळ तोंडवळकर
१०४ अणुबंधन को.ऑ.हौ.सो. फ्लॅाट ३८
सेक्टर १७, कोपरखैराणे, नवी मुंबई ४०० ७०९

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी
सहनिबंधक सहकारी संस्था सिडको, नवी मुंबई
शहर व आद्योगिक विकास महामंडळ, बेलापूर रेल्वे
स्टेशन इमारत, टॉवर क्र.८, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी
सहनिबंधक सहकारी संस्था सिडको, नवी मुंबई
शहर व आद्योगिक विकास महामंडळ, बेलापूर रेल्वे
स्टेशन इमारत, टॉवर क्र.८, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १२/६/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १५/११/२०२१ | ---- | २२/११/२०२१ | २०/१२/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२४/१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १२/६/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे, सहकारी अधिकारी श्रेणी-१, सहनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" Monthly/Weekly report submitted by Authorised officer Shri Ganesh GiriGosavi since his appointment from २८th Aug २०१८ till August २०२१ Panel Number & List of appointment in Government listed panel of Shri Ganesh Giri Gosavi with Professional remuneration details"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२०/१२/२०२१ रोजी, *" जाब देणार जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांनी माहिती अधिकारात मुद्दा क्र.०५ बाबत मागणी केलेली माहिती सदरचा आदेश प्राप्त झालेपासून १५ दिवसांचे आत या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेस देण्यात यावी. जी माहिती उपलब्ध नाही त्या बाबतीत तसे अर्जदार यांना स्पष्टपणे कळविण्यात यावे. मुद्दा क्र.०१ ते ०४ ची माहिती संस्था स्तरावरील असल्याने संस्थेने उपलब्ध असलेली कागदपत्रे व माहिती लेखी स्वरूपात अर्जदारास द्यावी आणि जी कागदपत्रे व माहिती उपलब्ध नाही त्याबाबत देखील लेखी कळविणेची दक्षता घ्यावी."* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, या विषयाची संबंधित नस्ती त्यांना त्यांचे कार्यालयात आढळून येत नाही त्यामुळे याबाबत म्हणणे मांडण्यासाठी वेळ हवा आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.८/७/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ जून, २०२५ .

**विवेचन**

उपरोक्त आदेशान्वये सदर प्रकरणाची सुनावणी दि.८/७/२०२५ रोजी ठेवण्यात आली होती. तथापि सदर दिनांकास काही अपरिहार्य कारणास्तव सदर सुनावणी होऊ शकली नाही. तद्नंतर सदर प्रकरणावर आज सुनावणी आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

मागील सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे यांनी असे निवेदन केले की, या विषयाची संबंधित नस्ती त्यांना त्यांचे कार्यालयात आढळून येत नाही त्यामुळे याबाबत म्हणणे मांडण्यासाठी वेळ देण्यात यावी. त्यांची विनंती मान्य करून

प्रकरणाची सुनावणी दि.८/७/२०२५ रोजी ठेवण्यात आली होती. त्या दिवशी सुनावणी होवू न शकल्याने या प्रकरणाची आज सुनावणी घेण्यात आली.

आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त होऊन देखील जन माहिती अधिकारी हे सुनावणीस अनुपस्थित आहेत. तसेच याबाबत त्यांनी कोणतीही पूर्वसूचना आयोगास दिलेली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी, सहनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १५/११/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१०/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ जुलै, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी, सहनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय -- **यांना प्रत** --
-- सहनिबंधक सहकारी संस्था सिडको, नवी मुंबई
शहर व आद्योगिक विकास महामंडळ, बेलापूर रेल्वे स्टेशन इमारत,
टॉवर क्र.८, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ **यांचेमार्फत रवाना.** (सहनिबंधक सिडको यांनी सदरची प्रत संबंधित तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

**विवेचन**

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणी आज दिनांक १०/९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे, सहकारी अधिकारी श्रेणी १, सहनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय उपस्थित व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.आदेश भोईर सध्या कार्यरत-लिपिक, शहरसेवा-२, सिडको अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे हे उपस्थित आहेत त्यांनी अद्याप तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करून दिली नाही. त्यांनी मौखिक निवेदन केले की, सध्या सदर सहकारी गृहनिर्माण संस्था त्यांचे कार्यालयाचे कार्यक्षेत्रात येत नाही. त्यामुळे त्यांनी ज्या उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाच्या कार्यक्षेत्र कार्यालया अंतर्गत सदर सहकारी गृहनिर्माण संस्था येते त्यांना माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्याची विनंती केली.

आयोगाने दि.२९/७/२०२५ रोजी विद्यमान जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसात माहिती देण्याचे आदेश दिले होते. असे असताना सदर माहिती उपनिबंधक सहकारी संस्था सिडको यांनी तक्रारकर्ता यांना उपलब्ध करून देणेबाबत कळविणेचे कोणतेही कारण श्री.शरद वाघमारे यांना नव्हते. तक्रारकर्ता यांनी ज्या गृहनिर्माण संस्थासंदर्भात माहिती मागणी केली आहे. ती संस्था विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे यांचे कार्यालयाचे कार्यक्षेत्रात नव्हती तर ती संस्था ज्या उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मोडते त्यांचे कार्यालयाकडून माहिती प्राप्त करून ती तक्रारकर्ता यांना उपलब्ध करून देणे आवश्यक होते. तथापि तशा प्रकारची कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ५ (४) नुसार जन माहिती अधिकारी यांना हे अधिकार प्रदान केले आहेत की मागणी केलेली माहिती ही त्यांचेकडे उपलब्ध नसेल तर ती माहिती ज्यांच्या कार्यालयात असेल त्यांचे सहाय्य घेऊ शकतात असे सहाय्य देणे अधिकारी/कर्मचारी यांना बंधनकारक आहे. आपणास असलेल्या या अधिकाराचा वापर न करता जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे यांनी आयोगाने स्पष्ट आदेश दिलेला असतानाही स्वत:ची जबाबदारी टाळण्यासाठी इतर अधिकारी यांना तक्रारकर्ता यांना माहिती पुरविणेबाबत विनंती केली आहे. आयोग आदेशानंतर असे करण्याचे अधिकार जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे यांना नाहीत .

आयोगाच्या दि.२९/७/२०२५ रोजीच्या आदेशामध्ये तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी, सहनिबंधक सहकारी संस्था सिडको यांनी तक्रारकर्ता यांच्या दि.१५/११/२०२१ च्या माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत अथवा तदनंतर देखील माहिती न पुरविलेमुळे त्यांचेवरुिध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २०(१) अन्वये

शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबत आज समक्ष खुलासा सादर करणेबाबत आदेश देण्यात आले होते. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.आदेश भोईर, सहनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय (सध्या कार्यरत- लिपिक, शहरसेवा २ सिडको) यांनी यासंदर्भात कोणताही खुलासा केलेला नाही तसेच ते आज सुनावणीस उपस्थित नाहीत. यावरून त्यांना कोणताही खुलासा करावयाचा नाही असे स्पष्ट होते.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.आदेश भोईर, सहनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय (सध्या कार्यरत- लिपिक, शहरसेवा विभाग २ सिडको) यांनी यासंदर्भात कोणताही खुलासा केलेला नाही तसेच ते आज सुनावणीस उपस्थित नाहीत. यावरून त्यांना कोणताही खुलासा करावयाचा नाही असे स्पष्ट होते. त्यांना दि.२९/७/२०२५ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२५०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून १ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन (रक्कम जमा केलेल्या चलनाच्या छायांकित प्रतीसह व्दितीय अपील क्रमांक स्पष्ट नमूद करून) पूर्तता अहवाल **व्यवस्थापक(कार्मिक), कार्मिक विभाग, सिडको** यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

२. आयोगाच्या दि.२९/७/२०२५ रोजीच्या आदेशानंतर देखील विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे, सहकारी अधिकारी श्रेणी १, सहनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय यांनी तक्रारकर्ता यांना माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.४/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० सप्टेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

१) सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

२) उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३) व्यवस्थापक (कार्मिक), कार्मिक विभाग,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ, सिडको भवन,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

४) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखा विभाग,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ, सिडको भवन,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

५) श्री.आदेश भोईर, (तत्कालिन जन माहिती अधिकारी, सहनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय)
लिपिक, शहरसेवा विभाग २, शहर व औद्योगिक विकास महामंडळ,
सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

६) विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे, सहकारी अधिकारी श्रेणी १,
सहनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ, बेलापूर रेल्वे स्टेशन इमारत,
टॉवर क्र.८, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

७) उपनिबंधक सहकारी संस्था सिडको कार्यालय,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ, बेलापूर रेल्वे स्टेशन इमारत,
टॉवर क्र.८, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.